

# नितिन गडकरी

पायाभूत संरचना दूरदर्शी





An initiative by RED Read. Engage. Deliver.
ADVERTORIAL

# परिवर्तनाचा दिशादर्शक

डॉ. प्रमोद चौधरी

**प्रगतिशील नेतृत्वासाठी ओळखले जाणारे मंत्री नितीन गडकरी यांचे भारताच्या जैवऊर्जा क्रांतीमध्ये महत्त्वाचे योगदान आहे. त्यांच्या प्रयत्नांनी जैवइंधनांचा स्वीकार आणि प्रसार वेगवान तर केला आहेच, परंतु शाश्वत आणि सर्वांगीण विकास केंद्रस्थानी ठेवून दीर्घकालीन उपलब्धी करून दिली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली, जैवअर्थव्यवस्थेत झालेल्या बदलांनी सामाजिक सक्षमीकरण, आर्थिक विकास आणि पर्यावरण संरक्षण या तिहेरी व्यासपीठावर महत्त्वपूर्ण परिवर्तन घडून येत आहे.**



'शाश्वत विकासासाठी आणि आत्मनिर्भर भारताची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी आयात कमी करणे, प्रदूषण नियंत्रणात आणणे तसेच ग्रामीण आणि कृषी क्षेत्रात विकासाची गंगा ही गतिशील रीतीने पुढे नेणे खूप महत्त्वाचे आहे. त्यामुळे होणारा सामाजिक-आर्थिक-पर्यावरणीय असा तिहेरी फायदा खूप मोलाचा ठरेल.' केंद्रीय रस्ते आणि महामार्ग वाहतूक खात्याचे मंत्री नितीन गडकरी यांची ही वक्तव्ये. माझ्या पंचाहत्तराव्या वाढदिवसाच्या निमित्ताने दिलेल्या संदेशात या तीन पैलूंकडे त्यांनी लक्ष वेधले. शेती आणि ग्रामविकास यांना तंत्रज्ञानाची जोड दिल्यास आपल्या कर्बोत्सर्गाच्या समस्येवर केवळ उत्तर मिळणार नाही, तर अर्थव्यवस्था म्हणूनही आपण सर्वसमावेशक बनून सर्वांगीण आणि शाश्वत विकास साधू, हा विश्वास त्यांच्या बोलण्यात होता.

सुमारे पंचवीस वर्षांपूर्वी इथेनॉल निर्मितीसाठी वेगवेगळे जैवभार वापरण्याच्या शक्यता तपासून पाहण्याच्या निमित्ताने आमची प्रत्यक्ष भेट घडली. जैवइंधनाच्या क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या ब्राझीलचा अभ्यासदौरा करून ते नुकतेच भारतात परतले होते. भारतीय संदर्भातून कोणत्या जैवभाराचा वापर करून आपण स्वदेशी तंत्रज्ञानाने इंधनासाठी इथेनॉलचे उत्पादन मोठ्या प्रमाणात करू शकू, याची चाचपणी त्यांनी सुरू केली होती. स्वयंपूर्णता आणि सर्वांगीण विकास यांतून देशविकास साधण्याचा ध्यास घेतलेल्या या नेत्याने माझ्यासह अनेक तंत्रज्ञान उद्योजकांना वेळोवेळी मार्गदर्शन आणि खंबीर पाठिंबा दिलेला आहे.

महाराष्ट्रात आणि केंद्रात आपल्या कामाचा ठसा उमटवणाऱ्या नितीनजींसारख्या नेत्याला खरे तर वेगळ्या परिचयाची गरज नाही. १९८९ पासून महाराष्ट्र विधिमंडळाच्या पटलावर सक्रिय कार्यरत असताना नितीनजींच्या कर्तृत्वाची खरी मोहोर उमटली ती १९९५ मध्ये महाराष्ट्राचे सार्वजनिक बांधकाम मंत्री म्हणून त्यांनी हाती घेतलेल्या रस्ते विकासाच्या कामांमुळे. मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग हा त्यांतील मानबिंदू म्हणावा लागेल. मुंबईत त्या काळात उभारलेल्या उड्डाणपुलांमुळे ते flyover- man म्हणूनही ओळखले जाऊ लागले. ग्रामीण भागांशी संबंधित प्रश्न सोडविताना त्यांनी महाराष्ट्रातील तेरा हजारांहून अधिक गावांना जोडणाऱ्या आणि राज्यातील ९८ टक्के लोकसंख्येला वर्षभर संपर्कक्षेत्रात ठेऊ शकणाऱ्या रस्त्यांचे जाळे विणले. केंद्रात २०१४ मध्ये मंत्रिपद हाती आल्यानंतर तर नितीनजींच्या कामांचा धडाका आणखी वेगाने सुरू झाला. रस्ते विकासासारख्या खात्याला त्यांनी देशाच्या आर्थिक विकासाच्या जणू केंद्रस्थानी आणले. परंतु, नितीनजींच्या विकासरथाला केवळ रस्तेबांधणी आणि त्यातून साधायची प्रगती यांचेच चाक नाही. या रस्त्यावरून वाहणारी वाहने आणि त्या वाहनांमधील इंधन हे भारताच्या प्रगतीचे वाहक असावेत, असा विचार ते मांडत आले आहेत. शाश्वत विकासासाठी आणि पर्यावरण संवर्धनासाठी भविष्यातील गरजांचा विचार करता, सर्व अक्षयऊर्जा पर्यायांना प्रोत्साहन देण्याची गरज आणि सामावून घेण्याची क्षमता आपल्या देशात आहे, ही त्यांची भूमिका आहे. या धर्तीवर अक्षय ऊर्जेच्या गरजेची कारणे माहीत करून घेणे महत्त्वाचे आहे.

भारत हा जगातील सर्वांत वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक असून, जगातील तिसऱ्या क्रमांकाचा ऊर्जा वापर करणारा देश आहे. २०५० पर्यंत जागतिक ऊर्जा वापरातील भारताचा वाटा दुप्पट होणार आहे. भारताची ऊर्जा आवश्यकता मुख्यत्वे आयात केलेल्या जीवाश्म इंधनाद्वारे पूर्ण होत असल्याने मोठ्या प्रमाणात परकीय चलन बाहेर जात आहे.त्याचप्रमाणे पर्यावरणीय संकट अधिकच तीव्र होत असून, मानवी प्रगती व परिसंस्थेवर प्रतिकूल परिणाम होत आहे. विकास आणि औद्योगिकीकरणामुळे आपण ऊर्जेवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहोत. त्यामुळे होत असलेल्या हरितगृह वायू (GHG) उत्सर्जनावर नियंत्रण ठेवण्यासाठी शाश्वत हवामान क्रिया अत्यंत आवश्यक आहेत. प्रामुख्याने खनिज इंधनांवर चालणाऱ्या वाहतूक क्षेत्रातून होणारे हरितगृह वायू उत्सर्जन कमी करण्याची तीव्र गरज आहे, जेणेकरून त्याची वाढ शाश्वत राहील. २०१५ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या अधिपत्याखाली आयोजित पॅरिस परिषदेत तापमानवाढीस कारणीभूत प्रदूषणकारी कर्बोत्सर्ग लवकर आटोक्यात आणण्यासाठी प्रत्येक देशासाठीची उद्दिष्टे निश्चित केली गेली. त्यानुसार २०७० पर्यंत नेट झिरो राष्ट्र बनण्याचे उद्दिष्ट (नॅशनली डिटरमाईंड कॉंट्रीब्युशन - एनडीसी) भारतापुढे ठेवले गेले.

अक्षय ऊर्जा पर्यायांबद्दल बोलताना, शेती-शेतीप्रक्रिया उद्योग आणि ग्रामीण विकास यांच्या असलेल्या ओढीने जैवऊर्जा आणि जैवइंधन हा गडकरींच्या विशेष आत्मीयतेचा विषय आहे. भारतात जैवइंधनाचा प्रवास २००० च्या दशकाच्या सुरुवातीस सुरू झाला. पण २०१८ मध्ये सादर केलेल्या राष्ट्रीय जैवइंधन धोरणाने या क्षेत्राला व्यापक चौकट प्रदान केली. या धोरणाचे उद्दिष्ट २०२५ पर्यंत पेट्रोलमध्ये २०% इथेनॉल मिश्रण आणि २०३० पर्यंत डिझेलमध्ये ५% बायोडिझेल मिश्रण साध्य करणे हे आहे. गडकरीजी जैवइंधन धोरणाचे खंदे पुरस्कर्ते राहिले आहेत. शेतकरी, साखर कारखाने, इथेनॉल उत्पादक, तंत्रज्ञान प्रदाते आणि नागरिक या सर्वच भागीदारांमध्ये जागरूकता पसरवताना इतर सहकाऱ्यांबरोबर जैवइंधन धोरणाचे जोरदार समर्थन त्यांनी नेहमीच केले आहे. याचाच प्रभाव म्हणून भारताने ऑगस्ट २०२२ मध्ये निर्धारित वेळापत्रकाच्या आधी १०% इथेनॉल मिश्रणाचे लक्ष्य गाठले. इथेनॉलच्या मागणी-पुरवठा साखळीत भविष्यात तफावत राहू नये म्हणून केवळ ऊसच नव्हे, तर तांदूळ, मका आणि इतर जैवभाराचाही वापर भविष्यात अन्नाची गरज भागवून ऊर्जा निर्मितीसाठी करता येईल, अशी भूमिका ते मांडत आले आहेत, जी आता सत्यात उतरत आहे. वाहन उत्पादक कंपनींकडून २०% इथेनॉल मिश्रणावर चालू शकणाऱ्या इंजिनाची वाहने एप्रिल २०२३ पासून उपलब्ध करून देण्याच्या धोरणामध्येही नितीनजींनी पुढाकार घेतला होता. वाहन तंत्रज्ञानातील एक महत्त्वाची प्रगती म्हणजे, ऑगस्ट २०२३ मध्ये नितीनजींच्या हस्ते २०% ते १००% इथेनॉलवर चालू शकणाऱ्या फ्लेक्स (बदलते मिश्रण) इंधन वाहनाचे अनावरण संपन्न झाले. २०३० पर्यंत इथेनॉलची गरज ही ५ पटींपेक्षा जास्त वाढेल हा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

स्वतः प्रगतिशील राहणे आणि इतरांच्या प्रयोगशीलतेला प्रोत्साहन देणे ही नितीनजींची खासियत. कल्पक प्रयत्नांना पाठबळ देणे त्यांचे कायम धोरण राहिले आहे. प्राज मॅट्रिक्स या आमच्या संशोधन व विकास केंद्रातील चालू घडामोडींची ते आवर्जून चौकशी करतात आणि वेगवेगळ्या तंत्रज्ञानातील प्रगतीचा आढावा नियमितपणे घेत असतात. शेतीतील टाकाऊ मालापासून इथेनॉलनिर्मितीसाठीच्या २ जी तंत्रज्ञानावर आधारित पथदर्शी प्रकल्पाचे उद्‌घाटनही त्यांच्याच हस्ते *(पान ४ वर)*

# द्रष्ट्या नेतृत्वाचे कर्तबगार दशक

अमोल बिराजदार



वाहतूक या क्षेत्राची व्याप्ती किती मोठी असू शकते, याचा अंदाज भारतीयांना पहिल्यांदा २०१४ ते २०२४ या दशकात आला. ट्रान्सपोर्ट म्हणजे केवळ रस्ते बांधणे आणि वाहतुकीच्या सोयी उपलब्ध करून देणे नसते. वाहतूक ही देशाची नर्व्हस सिस्टीम असते आणि तिच्या स्थितीवर देशाची कामगिरी ठरत असते. गेले दशकभर केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री असलेले नितीन गडकरी यांनी दशकभरात वाहतुकीच्या विषयाला किती पैलू असू शकतात आणि किती अंगांनी हा विषय हाताळला जाऊ शकतो, हे नुसते सांगितले नव्हे, तर कृतीतून सिद्ध केले. रस्ते आणि महामार्गांचे बांधकाम, उड्डाणपूल, टनेल्स याखेरीज अपघात कमी करण्यासाठीचे उपक्रम, फास्टॅग प्रणाली, जलस्त्रोतांचे खोलीकरण करून त्यातील मटेरियलचा वापर महामार्गांच्या बांधकामात करण्याचा दिशादर्शक बुलडाणा पॅटर्न, फ्लाय ॲश, वेस्ट प्लास्टिकसारख्या पदार्थांचा महामार्ग बांधकामात वापर अशा विविधांगी पद्धतीने रस्ते व महामार्ग मंत्रालयाने श्री. गडकरी यांच्या मार्गदर्शनात काम केले आणि दशकभरात अनेक विक्रमांची नोंद झाली. 'हम केवल सडकें नहीं बना रहे हैं, हम राष्ट्र का निर्माण कर रहे हैं' या भावनेतून श्री. गडकरी यांच्या नेतृत्वात केंद्रीय वाहतूक मंत्रालयाने काम केले.

रस्ते-महामार्ग विकास

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनात आणि नितीन गडकरी यांच्या नेतृत्वाखाली रस्ते-महामार्ग क्षेत्रात मोठा विकास झाला. गेल्या दहा वर्षांत दुर्गम भागांना जोडणाऱ्या रस्त्यांसह देशभरात एकूण ९६,०८८ किलोमीटरचे राष्ट्रीय महामार्ग बांधण्यात आले आहेत. २०२४ मध्ये देशभरातील एकूण महामार्गांचे नेटवर्क होते ९१,२८७ किलोमीटर्स. २०२४ मध्ये ते १,४६,१४५ किलोमीटर्स एवढे प्रचंड झालेले आहे. म्हणजे दशकभरात ५५ हजारांहून अधिक किलोमीटर्सचे (६० टक्के) नवीन राष्ट्रीय महामार्ग बांधले गेले आहेत. २०१४ मध्ये फोर लेन किंवा त्याहून अधिक लेन्स असलेल्या महामार्गांचे देशभरातील नेटवर्क १८ हजार किलोमीटर्सचे होते. २०२४ मध्ये ते ४५ हजार किलोमीटर्सच्या वर गेलेले आहे. टू लेन विथ पेव्ड शोल्डर या प्रकारातील महामार्गांचे नेटवर्क २०१४ मध्ये ४५ हजार किमीचे होते. ते दशकभरात ८४ हजार किमीवर गेले आहे. २०१४ पर्यंत वर्षभरात जेमतेम चार हजार किमी रस्ते बांधकामाची कामे व्हायची. आता ती वर्षाकाठी ११ हजार किमीची होतात. २०१४ पर्यंत ११.६ किमी प्रतिदिन हे रस्ते बांधकामाचे प्रमाण होते. ते दशकभरात ३७ किमी प्रतिदिन म्हणजे तिपटीहून अधिक वाढले. टोल प्लाझावरच्या प्रतीक्षेचा सरासरी वेळ पूर्वी ७३४ सेकंद होता. आता तो ४७ सेकंदांवर आलेला आहे. कोणतीही समस्या सोडवण्यासाठी गडकरीजी अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरण्याच्या मताचे आहेत. उपग्रह आधारित (Satellite-Based) टोलिंग सोल्यूशन्स आणण्याच्या कल्पनेचे त्यांनी स्वागत केले आहे, जेणेकरून टोल प्लाझावर थांबण्याची गरजच पडणार नाही आणि प्रवास केलेल्या अंतरानुसार प्रवासी टोल भरू शकतील. यामुळे टोल प्लाझावर वेळेची आणि इंधनाची मोठी बचत होईल.

**वाहतूक ही देशाची नर्व्हस सिस्टीम असते आणि तिच्या स्थितीवर देशाची कामगिरी ठरत असते. गेले दशकभर केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री असलेले नितीन गडकरी यांनी दशकभरात वाहतुकीच्या विषयाला किती पैलू असू शकतात आणि किती अंगांनी हा विषय हाताळला जाऊ शकतो, हे नुसते सांगितले नव्हे, तर कृतीतून सिद्ध केले.**




शाश्वत आणि पर्यावरणानुकूल विकासावर भर

गडकरी यांच्या मार्गदर्शनात गेल्या दशकभरात आणखी एक महत्त्वाचा बदल रस्ते व महामार्गांच्या बांधकामात झाला आणि तो म्हणजे पर्यायी मटेरियल किंवा सामुग्रीचा या बांधकामात प्राधान्याने वापर करण्यात आला. त्यातून पर्यावरण संवर्धनाचे कामही झाले. या तंत्राला जलसंवर्धनाची जोड देण्यात आली आणि त्यातून बुलडाणा पॅटर्नसारखी संकल्पना आकाराला आली. शेकडो *(पान २ वर)*

वेध भविष्याचा.. आस समतेची.. दृष्टी न्यायाची,
प्रेरणा नवनिर्मितीची.. ध्यास विकासाचा..

मा. ना. श्री. नितीनजी गडकरी
केंद्रीय मंत्री, रस्ते वाहतुक व महामार्ग
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !



S.S.ENGINEERS
Sugar, Power & Distillery Plants

Reg. Works : J - 179, M.I.D.C., Bhosari, Pune - 411026,
Web : www.ssengineers.com | Email : info@ssengineers.com

# राजकारणाच्या पलीकडचा माणूस

डॉ. मुरलीधर चांदेकर





**नितीन गडकरी हे यशस्वी राजकारणी असले तरी ते यशस्वी माणूस म्हणून मला अधिक महत्त्वाचे वाटतात. कार्यकर्त्यांच्या सुखदु:खात समरस होणारा माणूस, सामाजिक भान राखणारे संवेदनशील मन, उच्च पदस्थानी असले, तरी समाजातील शेवटच्या माणसाची चिंता करण्याचे भान, जात-पात, धर्म, उच्च-नीच या भावनेच्या पलीकडे जाऊन सर्वसमावेशक विचार व व्यवहार. हा हळव्या मनाचा माणूस माझ्यासारख्यांना अधिक भावतो.**

परवा नितीनजींच्या घरी / कार्यालयात जाण्याचा योग आला. ते ज्या ठिकाणी बसतात तिथे 'मनसा सततम् स्मरणीयम् , वचसा सततम् वदनियम्, लोकहितं मम करणीयम्' या गीताच्या ओव्या वाचल्या. ते शब्द म्हणजे नितीनजींचा जीवन संकल्प आहे. मला सहज विद्यार्थी परिषदेचा कार्यकर्ता नितीन गडकरी आठवले. खरंतर ते आणीबाणीच्या काळाच्या आधीपासून विद्यार्थी परिषदेचे कार्य करीत होते व मी १९७९ ला म्हणजे आणीबाणीच्या काळानंतर माझ्या अकरावीच्या प्रवेशासाठी विद्यार्थी परिषदेचे तत्कालीन विदर्भ प्रदेश मंत्री नितीन गडकरी यांना भेटण्यासाठी गेलो होतो व भेट झाली. लगेच स्वत: विद्यार्थी असताना महाविद्यालयाच्या प्राचार्यांना माझ्या प्रवेशासाठी नितीनजींनी चिठ्ठी दिली व मला ११ वीत प्रवेशदेखील मिळाला. त्यानंतर अभाविपच्या त्यांच्याच निवासस्थानी होणाऱ्या साप्ताहिक बैठकीत त्यांच्यासोबत भेटण्याचा व बोलण्याचा खूपदा योग आला व तो आजतागायत येतो आहे. या ४५ वर्षांच्या गडकरींच्या सहवासात अनेक रूप बघण्याचा योग मला आला.

सामाजिक कार्याचा वारसा पूर्वीपासूनच नितीनजींची आई भानुताई गडकरी ह्यांच्यामुळे लाभल्याने सामाजिक कार्यात सतत रमणारे नितीनजी शेवटच्या घटकाला अभ्यास करून उत्तम श्रेणीत पास होणारे नितीनजी आम्ही पाहिले. विद्यार्थी परिषदेविषयी त्या काळात फारशी अनुकूलता नसूनही विद्यार्थी निवडणुकांची बांधणी करणारा नितीन तोही आम्ही बघितला. यश पदरी पडण्याचा आनंद तो क्वचितच मिळत असे. आर्थिक परिस्थिती बेताची असल्यानंतर एकुलता एक मुलगा असल्यामुळे नीलम फर्निचर या नावाने सीताबर्डी येथे दुकान सुरू करून कौटुंबिक जबाबदारी पेलणारा नितीन, तोसुद्धा आम्ही बघितला, शिक्षण संपल्यानंतर भारतीय जनता युवा मोर्चाची नागपूर महामंत्री म्हणून जबाबदारी नितीनजींकडे आली. त्यानंतर व्यापक क्षेत्रात कार्य करण्याची संधी त्यांना मिळाल्यामुळे तेव्हा नितीन गडकरींच्या कामाची तडफ, परिश्रम, भरारी हे नागपूरवासीयांना दिसायला लागली व त्यानंतरचा त्यांचा चढत्या क्रमाचा राजकीय प्रवास ते आजच्या भारत सरकारचे सर्वांत सक्षम व प्रभावी मंत्री म्हणून नितीन गडकरी संपूर्ण देशाला परिचित आहेत.

नितीन गडकरी हे यशस्वी राजकारणी असले तरी ते यशस्वी माणूस म्हणून मला अधिक महत्त्वाचे वाटतात. कार्यकर्त्यांच्या सुखदुःखात समरस होणारा माणूस, सामाजिक भान राखणारे संवेदनशील मन, उच्च पदस्थानी असले तरी समाजातील शेवटच्या माणसाची चिंता करण्याचे भान, जात-पात, धर्म, उच्च-नीच या भावनेच्या पलीकडे जाऊन सर्वसमावेशक विचार व व्यवहार. मला वाटतं हे भारत सरकारचे मंत्री असण्यापेक्षाही एक हळव्या मनाचा माणूस हा माझ्यासारख्यांना अधिक भावतो. करोना काळातील गडकरींचे योगदान हे संपूर्ण विदर्भाला ''जीवनदान'' देणारं असंच होतं. हा विदर्भ गडकरींना कधीच विसरणार नाही.

ऑगस्ट २०२० ला माझ्या आईचं दुःखद निधन झालं. करोनाच्या भीतीमुळे संपूर्ण देश हादरला होता. माझ्या आईच्या दुःखद निधनाची बातमी नितीनजींना कळली व मला निरोप आला की नितीनजी आणि कांचनताई गडकरी वहिनी भेटायला येण्यासंबंधी. मी नितीनजींना विनंती केली की हे वातावरण तब्येतीला चांगलं नाही, तुम्ही भेटायला येऊ नका. पण अशा दुःखद प्रसंगी नितीनजी ऐकतील तर ते नितीन गडकरी कसले? व ते सपत्निक भेटायला आले.

मी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात कुलगुरू असताना विद्यापीठाच्या दीक्षांत सोहळाप्रसंगी त्यांनी माझ्या केलेल्या कार्याचे कौतुक व पाठीवर मारलेली थापसुद्धा मला सतत प्रेरणा देणारीच ठरली. त्यामुळे अशा अनेक प्रसंगी नितीनजींकडून आम्हा सगळ्या मित्रांना प्रेरणा मिळत असते. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे संस्थापक व आमचे प्रेरणास्थान श्रद्धेय दत्ताजी डिडोळकर ह्यांच्या जन्मशताब्दी समारोह समितीचे नितीनजी अध्यक्ष आहेत. त्यांच्या या सर्वव्यापी कार्याच्या व्यस्ततेत त्यांच्याकडून सातत्याने होत असलेल्या मार्गदर्शनाने आम्ही प्रेरित होत असतो व त्यांच्याकडे बघून कार्य करीत असतो. नितीनजींच्या प्रेरणेने १९९८ पासून स्व. लक्ष्मणराव मानकर ट्रस्टतर्फे विदर्भातील दुर्गम व आदिवासी भागात ११०० एकलव्य एकल विद्यालयाच्या माध्यमातून २८००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, हा नितीनजींची सामाजिक दूरदृष्टीचाच परिणाम आहे.

राजकारणात चढ-उतार येतच असतात. पण, जी माणसे स्व-कर्तृत्वाने जनमानसात बसतात, तेच खरे महान असतात. विद्यार्थी जीवनात विद्यार्थी परिषदेचं कार्य करताना सहजपणे आम्हा कार्यकर्त्यांना दृष्टी देणारे नितीनजी आज आपल्या कार्यकर्तृत्वाच्या माध्यमाने संपूर्ण देशाला दृष्टी देण्याचं कार्य करत असल्याच्या आपल्या सर्वांना अभिमान आहे. आज २७ मे रोजी त्यांचा वाढदिवस असल्यामुळे आयुष्याच्या नवीन वर्षात ते पदार्पण करणार आहेत. परंतु, ज्यांचा आयुष्यात 'लोकहितं मम करणीयम्' म्हणजे लोकांचं हित हेच माझे हित आहे व मी ते पूर्ण करणारच, असा निश्चयाचा महामेरू, आमचे प्रेरणास्थान व मार्गदर्शक नितीनजींना असे कार्य करण्यासाठी ईश्वर सदृढ आरोग्य व दीर्घायुष्य देवो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

*(लेखक संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे माजी कुलगुरू आहेत.)*

## परिवर्तनाचा दिशादर्शक

**(पान १ वरून)** झाले होते. जैवइंधन उत्पादनात व्यावसायिक व्यवहार्यता वाढवण्यासाठी जैवइंधनांबरोबर सहउत्पादन पदार्थांचे मूल्यस्थापन करणेही तितकेच महत्त्वाचे आहे, हे नितीनजी वेळोवेळी सांगत आले आहेत. २ जी इथेनॉल प्रक्रियेमधून उरणाऱ्या लिग्निनपासून रस्तेबांधकामातील डांबराला पर्यायी असे बायो-बिटूमेन बनवण्याचे प्राजचे तंत्रज्ञान हे याचे उत्तम उदाहरण आहे. रस्ते वाहतुकीप्रमाणेच हवाई वाहतुकीसाठीही विकसित जैवइंधन तंत्रज्ञानाची अपेक्षा व्यक्त करताना त्यांनी लवकरच अपेक्षित असलेल्या हवाई जैवइंधन धोरणाचे समर्थनही करण्याचे आश्वासन दिले. नितीनजींनी वारंवार दिलेले हितोपदेश हे असे तंत्रज्ञान विकसित करणाऱ्या माझ्यासारख्यांच्या पाठीशी राहिल्यानेच आपण या बाबतीत देश म्हणून प्रगती साधण्यात यशस्वी होऊ शकलो आहोत.

आपल्या देशातील शेतकऱ्यांनी आता अन्नदाता म्हणून भूमिका बजावतानाच ऊर्जादाताही व्हावे, अशी अपेक्षा नितीनजी नेहमी व्यक्त करत असतात. समाजकारण-अर्थकारण-पर्यावरण या विकासाच्या तीन स्तंभांमधील समतोल साधणारी आणि त्यातून शाश्वत विकास साधण्याचीच यात अपेक्षा आहे. जैवइंधनाची जोड मिळाल्यास खनिज इंधनाच्या आयातीवर खर्च होणारे आपले बहुमोल परकीय चलन तर वाचणार आहेच, शिवाय आरोग्यावर आणि पर्यावरणावर विपरीत परिणाम करणारे प्रदूषणही नियंत्रणात येणार आहे. परंतु या दुहेरी लाभांपलीकडे जाणारा जैवइंधनाचा फायदाही त्यांच्यासाठी तितकाच महत्त्वाचा आहे. कारण जैवइंधनाच्या जैवभाराचा मुबलक पुरवठा करू शकणाऱ्या आपल्या शेतकरीवर्गाचा जीवनस्तर उंचावण्यास आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्यास हे निमित्त ठरणार आहे.

नितीनजींचे व्यक्तित्व आणि नेतृत्व हे विकसित भारत घडवण्यासाठीची पायाभरणी करणारे आहेत. शाश्वत आणि सर्वांगीण विकासासाठी त्यांच्यासारखी दूरदृष्टी असलेला धोरणकर्ता नेता भारतभूमीला महत्त्वाचा आहे. त्यांचे स्वयंरोजगार आणि ग्रामीणविकासाचे लक्ष्य खऱ्या अर्थाने भारताला आत्मनिर्भर करण्याच्या परिवर्तनासाठी दिशादर्शक आहे. त्यांच्या चक्रीय अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याच्या ध्येयाला नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाद्वारे पूर्ण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. भारताचे स्वातंत्र्याच्या शतकमहोत्सवी वाटचालीपर्यंत विकसित देश होण्याचे स्वप्न साकार होण्यासाठी त्यांच्यासारख्या महत्त्वाकांक्षी व सुजाण नेत्याला दीर्घायुष्य लाभो, या सदिच्छा !

*(लेखक प्राज इंडस्ट्रीजचे संस्थापक - अध्यक्ष आहेत.)*

# नितीन गडकरी... एक लोकनेता

**(पान ३ वरून)** व्यवस्थेप्रमाणे अतिथी आसनकक्षात विराजमान असतात. त्या वेळी त्यांच्याजवळ राजकीय किंवा शासकीय लवाजमा नसतो. अजूनही कधी मनात आले, तर सर्व लवाजमा बाजूला ठेवून अगदी दुचाकीवरूनही नितीनजी संघ मुख्यालयात जात असतात. नितीनजींवर नंतर त्या काळात नियतीने लोकसभा निवडणूक लढण्याची जबाबदारी सोपविली होती. तोपर्यंत प्रत्यक्ष निवडणूक अशी नितीनजींनी कधीही जिंकली नव्हती. पण, अप्रत्यक्ष निवडणुकीत मात्र आपल्या विजयाचा झेंडा सातत्याने रोवला होता. विधान परिषदेच्या नागपूर पदवीधर मतदारसंघातून सलग मिळविलेल्या तीन-चार विजयात एक विजय तर त्यांनी बिनविरोध मिळविला होता. अशा नितीनजींनी लोकसभा लीलया जिंकली आणि ते केंद्रात रस्ते आणि बांधकाम विभागाचे मंत्री झाले. २०१४ आणि २०१९ या विजयानंतर आता पुन्हा हॅटट्रिक करायला ते २०२४ मध्येही नागपूर लोकसभा मतदारसंघात उभे आहेत. आज संपूर्ण विश्वात उत्तम रस्ते बांधणारे, पीपीपी पद्धतीने रस्ते व पूल बांधणारे मंत्री म्हणून त्यांनी लौकिक संपादन केला आहे. आज भारतात कुठल्याही भागात जा, रस्ते बांधकाम सुरू आहे, हाच अनुभव येतो. सरकारजवळ पैसा मर्यादित असतो, हे सत्य असले तरी नितीनजींच्या खात्याकडे मात्र पैसा धावत येतो. फक्त भारतातूनच नव्हे तर विदेशातूनही गुंतवणूकदार त्यांच्याकडे विश्वासाने पैशांची गुंतवणूक करतो. आणि नितीनजींचे खातेही त्याचा भरपूर परतावा देत ते परत करीत असतात. गुळगुळीत रस्ते, पूल, केवळ राष्ट्रीय महामार्ग नव्हे तर ग्रामीण, गाव, खेड्यातून महामार्गाला जोडणारे रस्ते यांचे विशाल जाळे त्यांनी उभारले आहे. संपूर्ण भारतात एक किमयागार म्हणून त्यांना ओळखले जाते. आता तर स्थिती अशी आली आहे की, लोकांना स्वप्न दाखवावी आणि त्याची पूर्तता नितीनजींनी करावी, हा नियम झाला आहे. त्यांनी ओव्हरब्रिज, अंडरब्रिज, पूल, मेट्रो या सगळ्यांची निर्मिती करताना एक आदर्श प्रस्थापित केला आहे. जमिनीसाठी इतका जास्त मोबदला दिला जातो, की पूर्वी सरकारी प्रकल्पांना जमिनी न देणारेही आता आमची जमीन घ्या, असा आग्रह नितीनजींना करू लागले आहेत.



फक्त रस्ते बांधणीच नाही तर नितीनजींनी आपल्या मतदारसंघातील सांस्कृतिक जीवनही संपन्न करून टाकले आहे. खासदार महोत्सव ही संकल्पना नितीनजींच्या डोक्यातून निघाली आणि नागपुरात प्रस्थापित झाली. क्रीडा क्षेत्रातही त्यांनी त्यांचा परिसस्पर्श केला आहे. खासदार क्रीडा महोत्सवातही संपूर्ण क्रीडा विश्व व संपूर्ण क्रीडा प्रकार ढवळून निघतात. वास्तविक बुद्धिबळासारखा खेळ हा प्रेक्षकांना आकृष्ट करणारा नसतो, पण नितीनजींनी त्याचेही सामने आयोजित केले आहेत. भरपूर बक्षिसांची लयलूट त्यांनी केली आहे. सामूहिक गीता पठण असो, रामरक्षा पठण असो, गणपती अथर्वशीर्षचे आवर्तने असो, यात जनसहभागाची नवीन नवीन शिखरे नितीनजींनी प्रस्थापित केली आहेत. नागपूरचा इतिहास सांगणारा लेझर शो त्यांनी नागपूरच्या फुटाळा तलावात उभा केला आहे. अजूनही त्याचे उद्घाटन झालेले नाही, पण त्याची भुरळ मात्र सर्वांना पडली आहे.

नितीनजींच्या आदर्शांपैकी एक आदर्श म्हणजे दत्ताजी डिडोळकर. दत्ताजींची जन्मशताब्दी त्यांच्याच अध्यक्षतेखाली नागपूर विदर्भात अतिशय थाटात संपन्न झाली. दत्ताजींचे नाव नागपूर विद्यापीठाच्या जवळच्या रस्त्याला देण्यात आले. आता टेकडी रोड ते फ्रीडम पार्क या मार्गावरील भुयारी वाहतूक सुरू होणार आहे. त्या रस्त्यालाही दत्ताजींचे नाव देण्यात आले आहे. कशी गंमत आहे बघा, ज्या वेळी नागपूरला पहिला फ्लायओव्हर नितीनजींनी बांधायला घेतला, त्या वेळी नागपूरची वाहतूक ही उत्तर-दक्षिण नाही, असे म्हणत अनेक खटले दाखल केले गेले होते. त्या त्या सर्व खटल्यांतून मार्ग काढत नागपूरचा आदिवासी गोवारी फ्लायओव्हर पूर्ण झाला. आता तीस वर्षांनी ज्या वेळी भुयारी रस्ता होत आहे, त्या वेळी नागपूरची वाहतूक पूर्व-पश्चिम नाही, उलट उत्तर-दक्षिण आहे, असे म्हणत या भुयारी रस्त्याला न्यायालयात आव्हान देण्यात आले. पूल बांधणे किंवा भुयारी रस्ता बांधणे ही सार्वजनिक पैशांची उधळपट्टी आहे, असा आरोप त्या वेळीही झाला होता आणि आजही होत आहे. पण, हे दोन्ही प्रकल्प नागपूर शहराचे भूषण ठरणार आहेत. नागपूर शहरात माणसाला माणसांनी वाहून नेणारी रिक्षापद्धती खूप प्रदीर्घ काळ होती. तशी ती वाहतूक व्यवस्था मानवी जीवनात खूप क्लेशकारक आणि त्रासदायक होती. नितीनजींनी सायकल रिक्षा इतिहास जमा केली आणि त्याची जागा आता ई-रिक्षांनी घेतली आहे. आता महिलाही नागपुरात ई-रिक्षा चालवू लागल्या आहेत. तसेच, टॅक्सी चालविणाऱ्या महिलांची संख्याही नागपुरात खूप मोठी झाली आहे.

नितीनजींनी हृदयाच्या ऑपरेशनसाठी मोठ्या प्रमाणात जनतेला पैसे उपलब्ध करून दिले आहेत. वयोमानाप्रमाणे ज्येष्ठ नागरिकांची श्रवणशक्ती मंदावत जाते म्हणून त्यांना मोठ्या प्रमाणात अल्प किमतीत श्रवणयंत्रे त्यांनी उपलब्ध करून दिली आहेत. सर्व महागडे वैद्यकीय उपचार नाममात्र दरात उपलब्ध करून देण्याची त्यांची योजना साकार होत आहे. या सगळ्यांचा लाभ घेणारे हे फक्त एका जाती किंवा धर्माचे नसतात किंवा एका राजकीय पक्षाचेही नसतात. पण सर्वांसाठी नितीनजींचा हा मदतयज्ञ जनताभिमुख असतो. नागपूर शहराला आणि विदर्भाला त्यांनी भरपूर नवनवीन प्रकल्प मिळवून दिले आहेत. मिहान, आयआयएम, एम्स, शिवाय विधी विद्यापीठ हे त्यांनी नागपूरला दिले आहेत. आज जनमानसात त्यांनी इतक्या विश्वासाचे स्थान निर्माण केले आहे की, ते जनतेला सांगतात मी निवडणुकीला उभा आहे, पण मला मत द्या, असे सांगणारे बोर्ड किंवा बॅनर मी लावणार नाही. माझा प्रचार माझी विकासकामे करतील. माझ्या राजकीय जीवनात माझी मुले किंवा मुलगी ही मंडळी माझी उत्तराधिकारी राहणार नाही. त्या सर्वांनी त्यांच्यासाठी राजकारणाशिवाय अन्य मार्ग निवडला आहे. एका अर्थाने राजकारणातील परिवारवाद त्यांनी संपुष्टात आणला आहे. परिवारवादाविना नवीन राजकीय संस्कृती त्यांनी विदर्भातील राजकारणाला प्रदान केली आहे. या त्यांच्या कर्तृत्वाला मानाचा मुजरा करावाच लागतो.त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना आभाळभर शुभेच्छा.

*(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)*

